# <u>सूचना</u>

**वाचा:** वाहनचालक पदाकरीता मुंबई उच्च न्यायालय, मुंबई च्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली जाहिरात दिनांक १४ मार्च, २०२२.

माननीय मुंबई उच्च न्यायालय, मुख्यालय, मुंबईच्या कार्मिक विभागाने वाहन चालक या पदासाठीच्या **मोटर वाहन परीक्षेसाठी (Driving Test) पात्र ७८ उमेदवारांची प्रसिध्द केलेली यादी दिनांक २८/०२/२०२३** च्या अनुषंगाने, सदर यादीत नावे नमुद असलेल्या पात्र उमेदवारांना असे कळविण्यात येत आहे की, वाहनचालक पदाकरिता **मोटर वाहन परीक्षा** खाली नमुद केलेल्या तारखेला व परीक्षा केंद्रावर घेण्यात येणार आहे.

**<u>परीक्षा स्थळ</u>**

**प्रादेशिक परिवहन कार्यालय,**
**(Regional Transport Office)**
**मुंबई (मध्य), ओल्ड बॉडीगार्ड लेन,**
**तुळशीवाडी, ताडदेव,**
**मुंबई (पश्चिम) रेल्वे स्थानकाजवळ, मुंबई—४०० ०३४.**

**दिनांक : २५/०३/२०२३** **सकाळी १०.०० वाजता**

वरील पात्र उमेदवारांना सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी मोटर वाहन परीक्षेसाठी वर नमुद केलेल्या तारखेला **सकाळी ९.०० वाजता परीक्षा केंद्रावर स्वखर्चाने उपस्थित रहावे**.

वरील पात्र उमेदवारांनी मोटर वाहन परिक्षेसाठी येताना स्वत:चा **वाहनचालकत्वाचा मुळ परवाना (Original Driving Licence) जो वैध आहे** तसेच सदर परवान्याची **स्वत: प्रमाणित (self attested)** केलेली **छायांकीत प्रत सोबत आणणे अनिवार्य आहे.**

वरील पात्र उमेदवारांना असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी मोटर वाहन परीक्षेसाठी येताना **चाळणी/लेखी परीक्षेच्यावेळी जे प्रवेशपत्र देण्यात आलेले होते ते सोबत आणणे अनिवार्य आहे**.

**सही/—**
**(मनोज एस. शर्मा)**
**प्रबंधक (कार्मिक)**

**दिनांक : १७ मार्च, २०२३**